


आयएफएससी आशियाई स्पर्धेचे रंगारंग सोहळ्यात जल्लोषात उद्घाटन

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 02/11/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 255 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# ठाकरे बंधूनी 'सत्याचा मोर्चा' गाजवला!

## शरद पवार आणि दोन्ही ठाकरे बंधूंची पुरावे देत आक्रमक भाषण !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : मतदारयाद्यांमधील घोळ आणि कथित मतचोरीविरोधात महाविकास आघाडी आणि मनसे नेत्यांच्या उपस्थितीत आज मुंबईत सत्याचा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे, तसेच महाविकास आघाडीचे शरद पवार, ठाकरे गट प्रमुख उद्धव ठाकरे, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात यांच्यासह अनेक प्रमुख नेते उपस्थित राहिले.**



तसेच याप्रसंगी शरद पवार, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनीही पुरावे देत आक्रमक भाषणं केली. या सत्याचा मोर्चात अनेक जिल्ह्यातून येऊन मोठ्या प्रमाणात नागरिकांनी सहभाग नोंदविला.यावेळी शरद पवार म्हणाले, काही ठिकाणी काही लोकांनी तक्रारी केली. बनावट आधारकार्ड तयार करुन मिळतात अशा त्या तक्रारी होत्या. कलेक्टर म्हणाले सिद्ध करा, पुरावे दिले गेले. मात्र ज्यांनी आरोप केला त्यांच्यावरच गुन्हे दाखल करण्यात आले. याचा अर्थ हे शासन या सगळ्याला समर्थन देतं आहे. आमच्या विचारधारा वेगवेगळ्या आहेत.पण देशाची संसदीय लोकशाही ही टिकवायची असेल, मतदानाचा अधिकार टिकवायचा असेल तर तुम्हाला आणि मला एक व्हावं लागेल. आज व्यासपीठावर असलेले नेते याच भावनेतून एकत्र आले आहेत एवढंच मी या ठिकाणी सांगतो आणि आपली रजा घेतो असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.उद्धव ठाकरे सभेत म्हणाले की, मी आणि राज दोघंही भाऊ एकत्र आलो आहोत. पण आम्ही तुमच्यासाठी आलो आहोत. मराठी माणसांसाठी. हिंदूंसाठी आणि महाराष्ट्रासाठी आलो आहोत. आम्ही पुढे जात असताना तुम्ही साथ दिली पाहिजे. साथ देण्याची धमक असेल तर हाताची मूठ वळवून दाखवा. हा फोटो मतचोराच्या बादशाहकडे पाठवा. मतचोरी केली तर ही मूठ तुमच्या टाळक्यात हाणल्याशिवाय राहणार नाही असं उद्धव ठाकरे म्हणाले.ठाकरे पुढे म्हणाले, निवडणूक आयोगाविरोधात आम्ही मोठं पाऊल उचलणार आहोत. चोर दिसेल त्याला तिथेच फटकवा. लोकशाही मार्गाने फटकवा. आम्हाला कायदा हातात घ्यायचा नाही. ॲनाकोंडा बसला आहे. मी मागेही आवाहन केल होतं. निवडणूक जशी जवळ येईल तसतशी यांची दडपशाही सुरू होईल. आम्ही कायदेशीर मार्ग अवलंबत आहोत.येत्या काही दिवसात आपण न्यायालयात जाणार आहोत. न्यायालयाकडून न्याय मिळतो की नाही पाहू. आम्हाला आता न्याय पाहिजे. सर्व पुरावे दिल्यानंतर. त्या न्यायालयात न्याय मिळेल याची खात्री आहे. नाही तर जनतेचं न्यायालय निर्णय घ्यायला तयार आहे, असंही उद्धव ठाकरे म्हणाले.राज ठाकरेंनी यावेळी विरोधकांसोबतच सत्ताधारी आमदारही दुबार मतदारांची तक्रार करत असतील, तर मग तपास करण्यासाठी अडवलं कुणी? असा सवाल उपस्थित केला. “आम्ही बोलतोय, उद्धव ठाकरे बोलतायत, शरद पवार बोलतायत की याद्यांमध्ये दुबार मतदार आहेत.

शेतकरी कामगार पक्षही बोलतोय, कम्युनिस्ट पक्षाचे लोक बोलतायत, काँग्रेसचे लोक बोलतायत.एवढंच नाही, भाजपाचेही लोक बोलतायत की दुबार मतदार आहेत. शिंदेंचे, अजित पवारांचेही लोक बोलतायत. अरे मग अडवलं कुणी? मग हे निवडणूक घेण्याची घाई का करत आहेत? साधी गोष्ट आहे. मतदारयाद्या साफ करा. त्यानंतर जेव्हा निवडणुका होती, त्यात यश-अपयश सगळ्या गोष्टी मान्य असतील. सगळं लपवून-छपवून चाललंय, ते कशासाठी?” असा सवाल राज ठाकरेंनी केला.“कल्याण ग्रामीण, डोंबिवली, मुरबाड, भिवंडीतले ४५०० मतदार आहेत. या मतदारांनी तिथेही मतदान केलं आणि मुंबईच्या मलबार हिल मतदारसंघातही मतदान केलं आहे.

महाराष्ट्रभर असे लाखो लोक आहेत जे या मतदानासाठी वापरले गेले”, असा दावा करत राज ठाकरेंनी वेगवेगळ्या मतदारसंघात किती दुबार मतदार आहेत, याची एक यादीच वाचून दाखवली.

# प्रारूप मतदार यादी 6 नोव्हेंबरला होणार प्रसिद्ध

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदारसंघांची प्रभागनिहाय विभाजित करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी ६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या यादीवर ६ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नागरिकांना हरकती व सूचना नोंदविण्याची संधी आहे.**



प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचनांवर छाननी, सुनावणी व निर्णय घेण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयानिहाय सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, अनिल भालसाकळे, माणिक चव्हाण आणि सुनील भागवानी यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आले आहेत.महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील २०५-चिंचवड विधानसभा, २०६-पिंपरी विधानसभा, २०७-भोसरी विधानसभा आणि २०३-भोर विधानसभा मतदारसंघ (ताथवडे गाव) या विधानसभा मतदारसंघांच्या मतदार यादी प्रभागनिहाय विभाजन करून तयार करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी ६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या यादीवर ६ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०२५ या काळात नागरिक आपल्या हरकती व सूचना महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील मतदार यादी कक्षात तसेच सर्व ८ क्षेत्रीय कार्यालयांत प्रत्यक्ष दाखल करू शकतात. या यादीवरील हरकती व सूचनांवर छाननी, सुनावणी व निर्णय घेण्यासाठी सहशहर अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांची क्षेत्रीय कार्यालयानिहाय प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.यामध्ये ‘अ’ व ‘फ’ क्षेत्रीय कार्यालयासाठी अजय सूर्यवंशी, ‘ब’ व ‘ग’ क्षेत्रीय कार्यालयासाठी अनिल भालसाकळे, ‘ड’ व ‘ह’ क्षेत्रीय कार्यालयासाठी माणिक चव्हाण आणि ‘क’ व ‘इ’ क्षेत्रीय कार्यालयासाठी सुनील भागवानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्राधिकृत अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी संबंधित क्षेत्रीय अधिकारी व कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची सहायक प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

संबंधित अधिकारी प्रारूप मतदार यादीबाबत नमुना ‘अ’ व ‘ब’ मध्ये प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांची तपासणी करून आवश्यक अहवाल प्राधिकृत अधिकाऱ्यांना सादर करावा, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
रविवार दिनांक 02/11/2025
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# महापालिकेच्या ब्लॉक आणि बॅरिकेडिंगच्या निर्णयाविरोधात संतापाची लाट

## माजी नगरसेवक शैलेश मोरे यांची तात्काळ ब्लॉक काढण्याची मागणी, अन्यथा आंदोलनाचा इशारा...

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मुख्य कार्यालयासमोरील जुन्या मुंबई-पुणे महामार्गालगतच्या अहिल्याबाई होळकर चौकातील मुख्य रस्त्यावर सिमेंटचे ब्लॉक टाकून बॅरिकेडिंग केल्याने नागरिक, व्यापारी आणि वाहनधारकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.**



आधीच वाहतूक कोंडी आणि गर्दीने ग्रस्त असलेला हा मार्ग, महापालिकेच्या नव्या प्रयोगामुळे आणखी अरुंद झाला आहे.याबाबत माजी नगरसेवक शैलेश मोरे यांनी शनिवारी (दि.1) या ठिकाणी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर निष्काळजीपणाचा आरोप करत “ताबडतोब हे ब्लॉक काढून टाकावेत, अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरून आंदोलन करू,” असा इशारा दिला.मोरे म्हणाले, “हा प्रमुख वर्दळीचा रस्ता आहे. अर्बन स्ट्रीट आणि चौक सुशोभीकरणाच्या नावाखाली यापूर्वीच हा मार्ग अरुंद करण्यात आला आहे. आता ‘जंक्शन इम्प्रुव्हमेंट’च्या नावाखाली सिमेंट ब्लॉक टाकून पुन्हा अरुंदीकरण करण्यात येत आहे.

गरज नसताना हा प्रयोग सुरू करण्यात आला असून, नागरिकांच्या दैनंदिन हालचालींना अडथळा निर्माण होत आहे.”ते पुढे म्हणाले, “बीआरटी, मेट्रो, रिक्षा स्टँड, बस थांबे यांच्यामुळे आधीच या परिसरातील वाहतूक विस्कळीत आहे. तरीदेखील महापालिकेने कोणतीही पूर्वसूचना न देता हा निर्णय घेतला. मेट्रोसाठी असणारा रिक्षा थांबा सुमारे १०० मीटरवर हलवावा, जेणेकरून वाहतुकीचा प्रवाह सुरळीत राहील. महापालिकेचे अधिकारी आज आहेत, उद्या नसतील; पण आम्ही स्थानिक आहोत. आमच्या भागात अराजकता निर्माण होऊ देणार नाही.

”याबाबत मतदारसंघातील चारही आमदारांना भेटून आपली भूमिका मांडणार आहे. जर प्रशासनाने तात्काळ निर्णय मागे घेतला नाही, तर आम्ही नागरिकांसह रस्त्यावर बसून आंदोलन करू.

यामुळे पिंपरी परिसरातील व्यापारी, वाहनचालक आणि नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून, वाहतूक कोंडीमुळे दररोज नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. वाहतुकीच्या सुरळीततेसाठी आणि नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेने या ब्लॉकविषयी पुनर्विचार करून तातडीने योग्य निर्णय घ्यावा, असे शैलेश मोरे म्हणाले आहेत.

# पिंपरी-चिंचवडच्या राजनंदिनीचा नेमबाजीत राज्यस्तरावर ‘कांस्य नेम’

## राष्ट्रीय खेळाडू अरुण पाडुळे यांचे मार्गदर्शन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड राष्ट्रीय रायफल प्रशिक्षण अकादमीमधील राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक अरुण पाडुळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेणारी नेमबाज कु. राजनंदिनी यादव हिने नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**



१९ वर्षाखालील वयोगटात महाराष्ट्रातून तिसरा क्रमांक मिळवत राजनंदिनीची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली आहे. या यशामुळे पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण निर्माण झाला आहे.राजनंदिनी सध्या प्रशिक्षक अरुण पाडुळे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली नियमित सराव करत असून, तिच्या शिस्त, एकाग्रता आणि दृढनिश्चयामुळे तिने अल्पावधीतच आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.या यशामुळे अकादमीमध्ये आनंदाचे वातावरण असून, सहकारी खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमींनी राजनंदिनीचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. सर्वांना विश्वास आहे की ती राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करेल.

“राजनंदिनीने अत्यंत शिस्तबद्धपणे आणि सातत्याने सराव करून राज्यस्तरावर उल्लेखनीय यश मिळवले आहे. तिच्यातील नेमबाजीची जाण आणि एकाग्रता प्रभावी आहे. राष्ट्रीय स्पर्धेत ती आणखी उत्कृष्ट कामगिरी करेल, असा मला पूर्ण विश्वास आहे.”

**— अरुण पाडुळे, राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक**

# पिंपरी-चिंचवड पोलीस दलात होणार भरती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात एकूण ३२२ पोलीस शिपाई पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू झाली असून, २९ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत इच्छुकांनी महाराष्ट्र पोलिसांच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**



भरतीतील एकूण ३२२ पदांपैकी विविध प्रवर्गांनुसार खालीलप्रमाणे वाटप करण्यात आले आहे प्रवर्ग पदसंख्या पुढीलप्रमाणे आहे. सर्वसाधारण पुरुष (९७), महिला उमेदवार (९७), खेळाडू (१६), प्रकल्पग्रस्त १६), भूकंपग्रस्त (६), माजी सैनिक (४८), अंशकालीन पदवीधर (१६), पोलीस पाल्य (१०), गृहरक्षक दल (१६), अनाथ उमेदवार (३), तसेच, आरक्षणनिहाय पदांची आकडेवारी EWS (46), SEBC (34), E&M (80), SC/ST (8), OBC (7), OBC (19), OBC (17), OBC (12), ST (22), SC (42), OBC (35).प्रथम शारीरिक चाचणी घेण्यात येईल. या चाचणीत किमान ५० टक्के गुण मिळवणाऱ्या उमेदवारांमधून १:१० प्रमाणात लेखी परीक्षेसाठी निवड केली जाईल. लेखी परीक्षा १०० गुणांची असून, उमेदवारांनी किमान ४० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे.शारीरिक व लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. मूळ कागदपत्रांची पडताळणी करून तात्पुरती निवड यादी जाहीर केली जाईल. अंतिम गुणवत्ता यादीनुसार उमेदवारांची निवड होईल. उमेदवार दहावी किंवा बारावी उत्तीर्ण व १८ ते २८ वर्षे वयोगटातील असणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी होणार असल्याने उमेदवार फक्त एका घटकातच अर्ज करू शकतो.

# हिंजवडीत प्रेमप्रकरणातून तरुणीवर चॉपरने वार!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : प्रेमप्रकरणातून आयटी हब असलेल्या हिंजवडी येथे एका १८ वर्षीय मुलीवर चॉपरने हल्ला करण्यात आला. दुपारी सव्वाचार च्या सुमारास घडलेल्या या घटनेत तरुणी गंभीर जखमी झाली आहे.**




या प्रकरणी हिंजवडी पोलिसांनी प्रियकर योगेश भालेराव, प्रेम लक्ष्मण वाघमारे आणि एका अल्पवयीन मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ वर्षीय तरुणी आणि आरोपी योगेश यांच्यात गेल्या काही महिन्यांपासून प्रेमसंबंध होते. योगेश विवाहित आहे आणि त्याच्या पत्नीला त्यांचे नाते कळल्यानंतर ती त्याला सोडून गेली. लग्नाबाबत १८ वर्षीय तरुणीकडे आरोपीने तगादा लावला.प्रेयसीचे दुसऱ्या तरुणाशी प्रेमसंबंध असल्याचं समजलं. ज्यामुळे योगेश संतप्त झाला. आज दुपारी सव्वाचार च्या सुमारास, हिंजवडीतील साखरे वस्ती येथे योगेशने दोन मित्रांसह प्रेयसीवर चॉपरने हल्ला केला. तिच्यावर चॉपरने सपासप वार केले.

तिच्या हाताला, तोंडाला आणि इतर भागात दुखापत झाली आहे. मुलीला ताबडतोब जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, तिची प्रकृती स्थिर आहे.

हिंजवडी पोलिसांनी ही माहिती दिली. पोलिसांनी आरोपीला तातडीने ताब्यात घेतलं आहे.

सहाय्यक पोलिस आयुक्त कुऱ्हाडे आणि पोलिस निरीक्षक बालाजी पांढरे यांनी माहिती दिली आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 02/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# आयएफएससी आशियाई स्पर्धेचे रंगारंग सोहळ्यात जल्लोषात उद्घाटन

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड — पिंपरी चिंचवड शहरात पहिल्यांदाच होत असलेल्या आयएफएससी आशियाई क्लाइंबिंग चॅम्पियनशिप २०२५चा भव्य उद्घाटन सोहळा अत्यंत जल्लोषात, मोठ्या उत्साहात पार पडला.**




देश-विदेशातील खेळाडू, मान्यवर आणि नागरिकांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात वातावरण उत्साहाने भारावून गेले. मान्यवरांच्या हस्ते बलून आकाशात सोडण्यात आले आणि त्या क्षणी संपूर्ण परिसरात जल्लोषाचा माहोल पसरला.या ऐतिहासिक स्पर्धेचे आयोजन इंडियन माउंटनिअरिंग फाउंडेशन, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि महाराष्ट्र स्पोर्ट क्लाइंबिंग असोसिएशन (MSCA) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. १ ते ४ नोव्हेंबर २०२५ दरम्यान योगा पार्क, पिंपळे सौदागर येथील अत्याधुनिक क्लाइंबिंग कॉम्प्लेक्स येथे ही स्पर्धा पार पडत आहे. यात १३ देशांतील सुमारे २०० युवा खेळाडू सहभागी झाले आहेत. उद्घाटन प्रसंगीआमदार शंकर जगताप, नानासाहेब काटे (भाजप, माजी विरोधी पक्षनेते, पिंपरी चिंचवड मनपा), कर्नल विजय सिंग (IMF, Retd. VSM), किर्ती पायास (सचिव, I M F S o u t h Asia), विलास पाडळ (उपायुक्त महापालिका),डॉ. राधिका पाटील, विजय कुमार खोराटे, (अतिरिक्त आयुक्त, महापालिका ),सुरेंद्र शेळके, किर्ती शेट्टी (Secretary General, IFSC Asia), राकेश इसिन (Secretary, IMF), श्रीकृष्ण कडुसकर आणि सागर पालकर (संकल्पक, क्लाइंबिंग सेंटर)उद्घाटन सोहळ्यावेळी आमदार शंकर जगताप म्हणाले, "महाराष्ट्रात प्रथमच आयएफएससी आशियाई क्लाइंबिंग चॅम्पियनशिप आयोजित होत आहे, आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका या ऐतिहासिक उपक्रमाचा भाग असल्याचा आम्हाला अभिमान आहे.

या स्पर्धेमुळे महाराष्ट्र आणि भारतातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यासपीठ मिळेल. भविष्यातही पालिका अशा स्पर्धांना संपूर्ण पाठबळ देईल."कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक स्वागतगीत "We will rock you" वर जोशपूर्ण नृत्याने झाली. त्यानंतर सादर झालेल्या कथक नृत्याने समारंभाला संस्कृतीचा ठसा दिला. ढोल-ताशांच्या गजरात परिसर दुमदुमून गेला, तर पंजाबी वाद्यांच्या जोशपूर्ण तालावर उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात नृत्याचा आनंद घेतला. विविध रंगी वेशभूषेत सजलेले कलाकार आणि नृत्यसमूह यांनी उद्घाटन सोहळ्याला कलात्मक आणि भव्य स्वरूप दिले.

# सहा एसटीपीच्या टेंडर प्रक्रिया रद्द करा - प्रशांत जगताप

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : पुणे महानगरपालिकेने नव्याने मान्य केलेल्या सहा एसटीपीच्या १८६० कोटीच्या टेंडर प्रक्रियेला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पुणे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप यांनी विरोध करत सदर टेंडर प्रक्रिया रद्द करण्यात यावी, अशी मागणी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे केली आहे. तसेच ही टेंडर प्रक्रिया रद्द न केल्यास येत्या सोमवारी पुणे महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर आंदोलन करणार असल्याचा इशारा देखील प्रशांत जगताप यांनी दिला.पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये मान्य केलेल्या सहा एसटीपी प्लांटचा प्रकल्प हा पुणेकरांसाठी धक्कादायक आहे, या सहा ही निवेदांची एकत्रित किंमत ही १८६० आहे, ज्या कंपनीला हे काम दिले त्या कंपनीला डोळ्यासमोर ठेवून ही निविदा प्रक्रिया करण्यात आली असल्याचा आरोप यावेळी प्रशांत जगताप यांनी केला.दिलेल्या निवेदनात जगताप यांनी म्हटले आहे की, दुर्दैवाने राज्यातील व केंद्रातील सत्ताधारी भाजपाच्या दबावाखाली या ठिकाणी पुणे महानगरपालिकेची लूट होत आहे आणि या ठिकाणी आयुक्त म्हणून आपण या संदर्भमध्ये कुठलीच दुरुस्ती करत नाही,हे समस्त पुणेकरांचे दुर्दैव आहे. आपण कालच्या स्थायी समितीमध्ये मान्य केलेला ६ एसटीपी प्लांटचा प्रकल्प हा पुणेकरांसाठी धक्कादायक आहे. या ६ ही निविदांची एकत्रित किंमत ही १८६० रु आहे. ज्या कंपनीला हे काम दिले आहे त्या कंपनीला डोळ्यासमोर ठेवून हि निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे असा आमचा आरोप आहे, ती संशयास्पद होतीच परंतु ज्या पद्धतीने नव्याने अटी मान्य करण्यात आल्या त्याच्यातून साधारणता पुणे महानगरपालिकेवर अर्थात पुणेकरांच्या कररुपी पैशांवर तब्बल ५०० कोटींचा दरोडा आहे हे सकृतदर्शनी दिसून येत आहे. पुणे महानगरपालिकेकडे असणाऱ्या हजारो कोटीच्या ठेवी, राज्य आणि केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानातून पुणे महानगरपालिकेला हे एसटीपी प्लांट तयार करणे,त्याचबरोबर पुढे चालवणे शक्य झालं असतं पण केंद्रातील भाजपच्या आणि राज्यातल्या भाजपच्या नेत्यांनी या ठिकाणी हस्तक्षेप करून या संदर्भामध्ये त्यांच्या मनाप्रमाणे टेंडर प्रक्रिया करायला लावली आणि आपल्या प्रशासनाने यासंदर्भामध्ये इमाने ईदबारे त्यांचा आदेश शिरसावंद्य मानला. त्याच्यामुळे निश्चित पुणे महानगरपालिकेला शेकडो कोटींचा फटका याच्यातून बसत आहे. माझ्या माहितीप्रमाणे ज्या कंपनीला हे टेंडर देण्यात आले आहे त्या कंपनीचे संचालक हे भारतीय जनता पक्षाचे अधिकृत पदाधिकारी आहेत आणि मग ज्या पुणेकरांनी भाजपला भरभरून मत दिली त्या भाजपच्या पदाधिकाऱ्यासाठी अशाप्रकारे सगळी उठा ठेव करून पुणेकरांच्या कररुपी पैशांवर तब्बल ५०० कोटींचा दरोडा घालणे कितपत योग्य आहे, याचा आपण विचार करून ही टेंडर प्रक्रिया रद्द करावी,ही समस्त पुणेकरांच्या वतीने विनंती आहे. आपण ही टेंडर प्रक्रिया रद्द न केल्यास येत्या सोमवारी आम्ही पुणे महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर आंदोलन करणार आहोत. त्याचबरोबर मा. उच्च न्यायालय मुंबई या ठिकाणी सुद्धा दाद मागणार आहोत, आपल्याकडून भ्रमनिरास होणार नाही अशी अपेक्षा बाळगतो. असेही सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

# लवकरच....!


मेट्रो सिटी
आयकॉन अवॉर्ड २०२५
METRO CITY ICON
AWARD 2025
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त
पुरस्कार सोहळा २०२५
वर्ष तिसरे
सामाजिक,शैक्षणिक,राजकीय,वैद्यकीय, व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मेट्रोसिटी आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येत आहे.
– आयोजक –
शबनम न्यूज मिडिया ग्रुप
शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स
अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734